# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

ई-मेलव्दारे

क्रमांक विकाअ/शिक्षण/ईमेल/२०१६/ 1112
दिनांक :- 13 MAY 2016

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व कायम विना अनुदानित, पदविका/पदवी संस्था.
तसेच एम.बी./एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था.
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थामधील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या शैक्षणिक शुल्काच्या ५० % प्रतिपुर्तीबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/EBC/२०१६/८६४ दि. १३ एप्रिल २०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थामधील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या शैक्षणिक शुल्काच्या ५० % प्रतिपुतीबाबत आपल्या जिल्हातील शासकीय संस्थेमधुन तपासणी करण्याबाबत कळविलेले होते. त्यानुसार आपण सबंधित संस्थेत जाऊन आपल्या संस्थेत पात्र ई.बी.सी. लाभार्थी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जाची तपासणी केलेली आहे. परंतु असे निदर्शनास आले की, तपासणी अधिकारी/कर्मचा-यांनी ज्या विद्यार्थ्यांचे शिक्षणामध्ये परीक्षेत नापास झाल्याने किंवा अन्य कारणाने एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा खंड पडलेला आहे अश्या विद्यार्थ्यांचे तसेच काही विद्यार्थ्यांनी हिवाळी २०१५ परीक्षेचा अर्ज भरलेला आहे परंतु उन्हाळी २०१६ परीक्षेचा अर्ज भरलेला नाही, अश्या विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजुर केलेले आहे

तेव्हा याव्दारे सर्व संस्थांना कळविण्यात येते की, अश्या विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजुर केलेले असल्यास असे अर्ज मंजुर करण्याकरीता सबंधित विद्यार्थ्याच्या अर्जासह व आवश्यक पुराव्यासह आपल्या संस्थेतील सबंधित काम हाताळणा-या कर्मचा-याने या कार्यालयात **दिनांक २०/५/२०१६** पर्यंत प्रत्यक्ष हजर राहुन मंजुर करुन घ्यावे. त्यानंतर असे प्रकरणाबाबत कार्यवाही केल्या जाणार नाही, व त्याबाबत हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी. .